# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १९ जानेवारी २०१६

## मुंबई विद्यापीठात उलगडणार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

मुंबई - भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती मुंबई विद्यापीठाच्या वतीने भव्य स्वरूपात साजरी करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने १२ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून या व्याख्यानमालेची सुरुवात २२ फेब्रुवारी २०१६ पासून होत आहे. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प आय सी एस एस आर चे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात हे गुंफणार आहेत. या निमित्ताने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांनी एका समितीची नेमणूक केली असून समितीच्या वतीने जयंती उत्सवासाठी विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. यामध्ये फिल्म डिव्हिजनच्या मदतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित चित्रपट उत्सव, विविध स्पर्धा, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची विपुल ग्रंथसंपदा आणि त्यांच्या जीवनावर आणि कार्यावर लिहिलेल्या विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. याचबरोबर ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान’ या विषयावर आठ दिवसांचे ऑनलाईन सर्टिफिकेट अभ्यासक्रमही राबविले जाणार आहेत.

याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुर्मिळ छायाचित्र, महत्वाचे दस्तऐवज आणि ग्रंथांचे जतन आणि संवर्धन करुन मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट येथील ग्रंथालयात ठेवण्यात येणार असून त्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत चळवळीत भाग घेतलेल्या अनेक सहका-यांशी चर्चा विनिमय करुन त्यांचे अनुभव लिखित स्वरुपात जतन करण्याचेही समितीच्या वतीने निश्चित करण्यात आले आहे. याच जोडीला जयंती उत्सवानिमित्त १४ एप्रिल २०१६ ला ‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे . मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात येणा-या व्याख्यानमालेत अनेक मान्यवरांना व्याख्यानमालेसाठी पाचारण करण्यात यावे असेही समितीने सुचविले आहे. या

व्याख्यानमालेसाठी साधारणतः भारतीय संविधान, परराष्ट्र धोरण, हिंदू कोड बिल, मजूर धोरण/ मजूर चळवळ, सामाजिक न्याय, सामाजिक लोकशाही अशा अनेक विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ जयंती ही मुंबई विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून त्या अनुषंगाने विद्यापीठामार्फत परिपत्रक काढण्यात येणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांनी आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला समितीचे निमंत्रक प्रा. बाळा भोसले आणि अर्थशास्त्र विभागाचे संचालक प्रा. नीरज हातेकर उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड, उपकुलसचिव (जनसंपर्क)